**प्रेसनोट दिनांक २२/०८/२०१९**
**फरासखाना पोलीस स्टेशन**
**चिंचवड पोलीस स्टेशन मधील पाहिजे आरोपीस केले जेरबंद**

दि. १८/०८/२०१९ रोजी सायंकाळी १७.३० वा. चे सुमारास कसबा पेठ पोलीस चौकीचे कार्यक्षेत्रात पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. नंदकिशोर शेळके, मसपोनि वर्षा तावडे, पोहवा बाठे, पोशि गाढवे, पोना सोमा, पोना अंकम, असे पायी पेट्रोलिंग करीत असताना शनिवार वाडा, गेट नं. १, पुणे येथे दोन मुले व एक मुलगी यांचे मागे दोन इसम पकडा पकडा असे ओरडुन पळत असताना दिसल्याने पायी पेट्रोलिंग करीत असलेले वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी पळुन जात असलेल्या तीन मुलांना पकडुन ताब्यात घेवुन, त्यांच्या पाठीमागे पळत असलेल्या इसमांना थांबवुन, त्यांच्याकडे चौकशी केली असता मुलांचे पाठीमागे पळत असलेल्या इसमाने त्याचे नाव राहुन जयसिंग ओहळ वय ४२ वर्षे रा. चिंतामणी चौक, आहेर नगर, चिंतामणी मंदिरासमोर, चिंचवड गांव, पुणे व त्याच्या सोबत असलेल्या इसमाने अमित उध्दव काळखे, वय ३४ वर्षे रा. लेन नं. ४, माधवनगर, धानेरी, पुणे असे नाव व पत्ते सांगुन कळविले की, माझी अल्पवयीन मुलगी ही १५ दिवसांपासुन घरातुन कोणास काहीएक न कळविता निघुन गेलेली असुन, त्याबाबत मी चिंचवड पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीवरुन भा.द.वि कलम ३६३ प्रमाणे गुन्हा नोंद आहे. असे सांगुन ताब्यात घेतलेल्या दोन मुलांसोबत असलेली मुलगी ही माझी मुलगी असल्याने मी व माझा मित्र त्यांचा पकडण्यासाठी पाठलाग करीत होतो. असे सांगितल्याने त्याबाबत चिंचवड पोलीस स्टेशन येथे शहानिशा करुन, चिंचवड पोलीस स्टेशन येथे दाखल असलेला गुन्हा रजि. नं. २७३/२०१९ भा.द.वि. कलम ३६३ या गुन्ह्याचे तपासी अंमलदार पोउपनि एस. एच. झेंडे चिंचवड पोलीस स्टेशन, पुणे यांचे ताब्यात पुढील कार्यवाही करीता देण्यात आलेले आहे.

वरील नमुद कामगिरी ही पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. नंदकिशोर शेळके, सपोनि श्रीमती वर्षा तावडे, पोहवा बाठे, पोशि गाढवे, पोना सोमा, पोना अंकम यांनी केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे